# प्रकरण तिसरे

## जे.पी.नाईक : कोरगांवकर ट्रस्ट व मौनी विद्यापीठ

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

# प्रकरण तीसरे

## जे.पी.नाईक : कोरगांवकर ट्रस्ट व मौनी विद्यापीठ --

पहिल्या व दुसऱ्या प्रकरणात जे.पी.नाईक यांचा पूर्ववृत्तान्त व त्याचे कोल्हापूर शहरातील कार्य सांगण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणात जे.पी.नाईक यांनी ग्रामीण शिक्षण व समाजशिक्षण या दृष्टिकोनातून व समाजाच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी सामाजिक कार्य करण्याच्या प्रेरणेने श्री मौनी विद्यापीठ गारगोटी व कोरगांवकर ट्रस्ट कोल्हापूर दोन संस्थेमध्ये अत्यंत महत्वपूर्ण भूमिका बजावली. या दोन्ही संस्थातील प्रत्येक कार्यामध्ये नाईक हे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कार्य करत होते. या दोन्ही संस्था मरमराटीला आल्या त्याचे श्रेय जे.पी.नाईक यांचेकडे जाते.

या प्रकरणात या संस्थेमार्फत त्यानी केलेले शिक्षण प्रसार कार्य व समाज कार्य सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

## जे.पी.नाईक व कोरगांवकर धर्मादाय संस्था --

कोल्हापूरात कोरगांवकर ही धर्मादाय संस्था आज एक नावाजलेली अशी सामाजिक कार्य करणारी म्हणून ओळखली जाते. अनेक लोकोपयोगी कामे ही संस्था करत आली आहे. ह्या अशा प्रथीत यश संस्थेच्या स्थापनेपासून जे.पी.नाईक यांचा संबंध आलेला होता. कोरगांवकर ट्रस्ट मार्फत सुध्दा जे.पी.नाईक यांनी अनेक नवीन उपक्रम राबविले.

### स्थापना --

श्री गोविंदराव कोरगांवकर यांच्या प्रथम वर्ष श्रध्दादिनी त्याचे सुपूत्र प्रभाकरपंत कोरगांवकर यांनी केली. त्या दिवशी त्यांनी आपल्या

मालमत्तेची कायदेशिर वाटणी आपल्या कुटुंबातील मंडळीमध्ये केली. आपल्या हिश्याची सर्व संपत्ती म्हणजे रु.१,९१,१८७ ची रोकड आणि ८४,००० किंमतीच्या ईमारती जमिनी व विमा पॉलिशी संस्थेला दान दिल्या. संस्थेची स्थावर व जंगम मिळकत आज बाजारभावाने एक कोटीच्या घरात आहे. [१]

दिनांक १६-५-१९४६ या दिवशी सुमारे पावणेतीन लाखाच्या एक विश्वस्तनिधी निर्माण केला गेला.त्याला श्री गोविंदराव कोरगांवकर धर्मादाय संस्था हे नाव देण्यात आले. [२] त्या नंतर प्रभाकरपंतानी आपल्या व्यापारात वेळोवेळी मिळालेला नफा तसेच आपल्या कुटुंबियांना झालेला नफा असे लाखो रुपये त्या ट्रस्टला वेळोवेळी दान केले. पश्चिम महाराष्ट्रातील एक महत्वाचा ट्रस्ट असा त्याला दर्जा प्राप्त झाला आहे.

जे.पी.नाईक व कोरगांवकर ट्रस्ट --

ट्रस्टचे संस्थापक व जे.पी.नाईक यांना एकमेकांच्या कार्याबद्दल आदर होता. ट्रस्ट स्थापन झाला त्यावेळी नाईक याचे कोल्हापूरातच वास्तव्य होते. तेव्हा ट्रस्टच्या स्थापनेपासून विचारविनिमय,सल्लामसलत, सेवक, ट्रस्टचे सेक्रेटरी, ट्रस्टी व अखेर अध्यक्ष या अनेक नात्यानी नाईक हे सुमारे पस्तीस वर्षे या ट्रस्टशी निगडित राहिले . या मुदतीत त्यानी ट्रस्टकरिता केलेल्या कामगिरीचा क्रमवार उल्लेख करणे अवश्य आहे कारण ते सर्व सार्वजनिक तसेच ही संस्था कोल्हापूरात व कोल्हापूरच्या आसपास कार्य करत आहे.

डॉ.नाईक यांनी ट्रस्टद्वारे कितीतरी नामवंत व्यक्तींना देशभक्तांना, शिक्षण तज्ज्ञांना,अर्थशास्त्रज्ञांना ,समाज प्रबोधनकारांना,संस्थेत आणले. त्याची व्याख्याने,चर्चासत्रे उभारली, पार पाडली व त्या द्वारे समाजाचे प्रबोधन केले. शंकरराव देव, आण्णासाहेब सहस्त्रबुध्दे यांच्या नंतर तितक्याच समर्थपणे नव्हे तर कांकणभर सरसच त्यानी विश्वस्त मंडळाचे अध्यक्षपद सांभाळले.

ट्रस्टची विश्वस्त सभा फारच खेळीमेळीने ते घेत. सर्व निर्णय एकमताने होत . सभा झाल्यावर सभेचा कार्यवृत्तांत ते स्वत: स्वहस्ते लिहित. नवीन ट्रस्टची निवड करताना त्याची दृष्टी फारच व्यापक असे हे पी.बी.साळुंखे , देवदत्त दाभोळकर,ॲड.शंकरराव खरात, दलितमित्र बापूसाहेब पाटील यांच्या निवडीतून दिसून येते. अशा या विश्वस्त मंडळापुढे कोरगांवकर ट्रस्टला मोठेपण लाभले.समाजाच्या स्तरात लोकात त्याचे नाव झाले.

संस्थेतून संस्था उभी करयाची जे.पी.नाईक यांना छंद होता. उदा.श्री. मौनी विद्यापीठ ,विद्या भारती,पुणे ,समाज प्रबोधन - पुणे, मातृ मंदिर - देवरुख, हिंद कन्या व विनयकुमार छात्रालय कोल्हापूर इ.[३] त्याच्या मार्गदर्शनाखाली ही धर्मादाय संस्था स्थापन करताना सेवक संघाच्या निर्मितीला अग्रस्थान दिले व पुढील उद्दिष्ट निश्चिती करण्यात आली.

समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला संपूर्ण अवकाश असल्याशिवाय समाज जीवन स्वतंत्र स्वावलंबी,सहकार्यमय,सामर्थ्यपूर्ण आणि समाधानी होऊ शकत नसल्याने सर्वोदय हाच सामाजिक जीवनाचा एकमेव आदर्श होऊ शकतो असे ते नेहमी म्हणत. साधकांची संख्या जितकी वाढेल तेव्हा आदर्श प्रत्यक्ष व्यवहारात उतरु लागेल. जीवनसाधना यशस्वी होण्यासाठी विविध साधकांनी आपआपल्या आंतरिक प्रेरणेप्रमाणे आणि नैसर्गिक शक्तिप्रमाणे व साधनेचे संशोधन संयोजन आणि संघटना अखंड चालू ठेवणे गरजेचे आहे. साधनेच्या सर्व क्षेत्रात सत्यनिष्ठा,निरहंकरिता व्यक्ति निरपेक्षता,स्वार्थबुध्दिचा अभाव आणि ध्येयासाठी जीवन समर्पिण्याची वृत्ति हे सद्गुण टिकविण्याचे साधक याचे प्रयत्न चालले आहेत.[४] अभ्यास करणाऱ्याचे जीवन परस्परांना उपकारक मार्गदर्शक आणि स्फूर्तिदायक झाले पाहिजे. महाराष्ट्राच्या सांप्रतचा सामाजिक परिस्थितीत हा जीवननिष्ठेने प्रेरित झालेल्या साधकाची आणि सुधारकाची विशेष

प्रकारची गरज आहे असे दिसत असल्याने मातृभावाने एकत्रित येऊ इच्छिणा-या साधकाचा एक संघ श्री गोविंदराव कोरगांवकर धर्मादाय संस्थेच्या वतीने निर्माण करण्यात यावा ही उद्दिष्टये नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली ठरविण्यात आली. कोरगांवकर ट्रस्टमध्ये सन १९४८ ते १९५९ पर्यन्त जे.पी. नाईक यांनी कार्य केले.

सन १९४६ मे १६ मध्ये ही संस्था स्थापन झाली.[५] सन १९४८ पासून या संस्थेशी जे.पी.नाईक यांचा संबंध आला. या संस्थेला विधायक कार्याचे त्यानी वळण दिले. कोरगांवकर संस्थेला मूर्त स्वरुप दिले.

सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टीकोनातून म.फुले,डॉ.आंबेडकर यांच्या विचाराचा मागोवा घेत समाज प्रबोधनाचे काम हाती घेतले. त्यासाठी त्याच्या विचाराची दिशा देणारे आणि समाज प्रबोधन करणारी पुस्तके प्रकाशित केली.

विविध प्रकारची व्याख्याने आयोजित करुन लोकांना समाज विकासाची दिशा दिली.ख-या अर्थाने संपूर्ण धर्मादाय संस्था सामाजिक कार्य करण्यामध्ये त्याच्या सहकार्याने पुढे आली. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासंबंधी , रोगपिडीतानाऔषध पाण्यासाठी मदत , पुरग्रस्थ,जळीत ग्रस्त लोकांना ही संस्था सढळ हाताने मदत करते. सामाजिक क्षेत्रामध्ये कार्य करणा-या कार्यकर्त्यांना प्रोत्साहनात्मक मानधन देण्याची प्रथा या काळात पडली.

भारताच्या स्वातंत्र्याशी भूमिगत क्रांतिकारकाना तसेच देशभक्ताना ब्रिटिश सरकारचा विरोध सहन करुनही केवळ देशभक्तीपोटी अनेक रकमा देण्याची व्यवस्था केली. एवढेच नव्हे तर उघड उघड आश्रयही दिला.

जे.पी.नाईक यांच्या विचाराने या संस्थेत मागासवर्गीय मुलीसाठी व मुलासाठी दोन वसतिगृहे चालविण्यात आली .(१) विनयकुमार छात्रालय, (२) हिंदकन्या छात्रालय, १९४७ .

मॅंबर अध्यक्ष म्हणून जे.पी.नाईक यांचे कोरगांवकर ट्रस्ट साठी कार्य ---

राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांना मदत करणे हा या ट्रस्टचा हेतू होताच त्यात व्यापक व विशाल दृष्टिकोन ठेवायला हवा ही गोष्ट नाईक यांनी प्रभाकरपंताच्या मनावर ठसविली. प्रभाकरपंत हे कॉंग्रेसचे अनुयायी पण जे त्या पक्षाव्यतिरिक्तही इतर पक्षात राजकीय कार्य नि:स्वार्थी पणाने व ध्येयवादीपणाने करतात,त्यानाही ट्रस्टने जरुर तेव्हा मदत केली पाहिजे. तसेच जे लोक आपले सर्व आयुष्य समाज कार्यात वेचतात ते कार्य आपल्या पसंतीचे असो वा नसो, अशाही कार्यकर्त्यांना ट्रस्टची मदत व्हायला हवी असा व्यापक दृष्टिकोन ट्रस्टने ठेवावा असा नाईक यांनी सल्ला दिला. आपले सर्वसाधारण धोरण म्हणून ट्रस्टने तो दृष्टिकोन स्वीकारला अशा ध्येयवादी सेवकांचा एक मातृसंघ जणू निर्माण करुन अशाना ट्रस्टतर्फे मानधन देण्यात आले किंवा प्रसंगी मदत केली. या संदर्भात आचार्य जावडेकर, आचार्य भागवत, एस.एम.जोशी, मामा क्षिरसागर,हरिभाऊ सोहनी, सौ.कुसुमताई व वसंतराव नारगोळकर,सौ. साधनाताई व बाबा आमटे या काही प्रमुख व्यक्ती त्यातील होत.

महाराष्ट्रात निरनिराळ्या भागात आणि निरनिराळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे सम्मेलन दरसाल भरविले जावे ही कल्पना सुचवून कै.गोविंदराव कोरगांवकर यांच्या पुण्यतिथीस १६ मे[६] अशी संम्मेलने भरत. त्यात मातृसंघात असलेल्या व्यक्ती ही हजर राहत.काकासाहेब कालेलकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रभाकर पाध्ये,पां.वा.गाडगीळ , गं.बा. सरदार,ना.ग.गोरे या काही संदर्भातील व्यक्ती होत.

इ.सन १९५२ च्या अखेरीस नाईक यांच्या पुढाकाराने शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांची परिषद बोलविण्यात आली.

मौनी विद्यापीठाच्या अभिनव शैक्षणिक प्रयोगात ट्रस्टला एक घटक म्हणून गोवून घेतले. ट्रस्टकडून कर्जे व देणग्या रुपाने विद्यापीठास मदत देवविली.

सन १९५३ ते १९५५ या साधारणत: तीन वर्षांत नाईक ट्रस्टच्या कार्यालयातच किंवा प्रभाकरपंताकडे राहात होते. या मुदतीत त्यांनी ट्रस्टचे सर्व रेकॉर्ड शिस्तीने लावले व ट्रस्टच्या जुन्या कुळाची खूपच वसुली केली. त्याकरिता नाईक हे त्याच्या नेहमीच्या कार्यपध्दतीप्रमाणे कुळांच्या घरी जात. त्यांच्या अडचणी समजाऊन घेत, तडजोडीने मार्ग काढत आणि सूटसाट व हप्तेबंदी देऊन सर्व व्यवहार आपापसात मागवून घेत. गुणे यांच्या औषधी कारखान्याच्या कर्ज फेडीसाठी तर नाईक यांनी त्या कारखान्याचे सोल डिस्ट्रिब्यूटर अशी एकत: भूमिका पत्करली व त्याच्या मालाची सुरळीत विक्री करुन देऊन म्हणजे अगदी सौदा देऊन ट्रस्टची वसुली केली. हे सर्व शक्य झाले कारण एकतर कोणत्याही समस्येला भिडगुण काम करण्याची नाईक याची पध्दती आणि त्या पध्दतीवर व व्यक्तिश: नाईकांच्यावर प्रभाकरपंताचा संपूर्ण विश्वास म्हणून नाईक यांनी परिस्थितीनुसार जे ठरविले त्याला प्रभाकरपंतानी ट्रस्टच्या वतीने संपूर्ण मान्यता दिली.

ट्रस्टचे पहिल्यापासूनचे एक विश्वस्त माई बागल ` नाईक यांच्या कार्याविषयी म्हणतात` त्यानी रात्रंदिवस काम करुन संस्थेची ठाकठीक करुन दिली. अनेक व्यवहार सुरळीत करुन दिले. काही हबघाईस आलेल्या कुळांना पुन: कर्ज घ्यावयास लावून कर्ज फेड करण्यास नेटके केले. यशवंतराव गुणे यांच्या औषधी कारखाना हे या पैकी एक ठळक उदाहरण आहे.[७]

ट्रस्टची साधंत माहिती देणारा एक अष्टवार्षिक अहवाल प्रथमत:च नाईक यांनी तयार करुन तो छापून घेतला ( १९५४ ) कोरगांवकर ट्रस्टचा एकदा अहवाल गाहाळ झाला पण नाईक यांनी स्मरणाने जसाच्या तसा स्वहस्ते लिहून काढला कारण त्याची स्मरण शक्ती अचाट होती.[८]

नाईक हे १९५७ मध्ये ट्रस्टी झाले म्हणून त्याचे मार्गदर्शन ट्रस्टला वारंवार मिळू लागले. १९५९ मध्ये तर ते ट्रस्टचे अध्यक्षच झाले. त्या बरोबरच त्यानी ट्रस्टची घटना व्यापक करुन घेऊन सुधारली. व्यापक सामाजिक दृष्टि

ठेवून दलितमित्र बापूसाहेब खरात यांना ट्रस्टी करुन घेतले.

सप्टेंबर १९८० मध्ये प्रा.गं.बा.सरदार यांच्या मार्गदर्शनाखाली ` समाज परिवर्तनाचे आगामी दशक ` या विषयासंबंधी एक अभिनव शिबिर घेण्यात आले. अखिल महाराष्ट्रभर समाज परिवर्तनाचे त-हत-हेचे कार्य करणा-या सुमारे पन्नास कार्यकर्त्यांनी यात भाग घेतला.

पुण्यात नाईक यांनी ` विद्याभारती ` ही जी प्रचंड संस्था स्थापन केली होती त्याच्या वसतिगृहास ` लक्ष्मीबाई कोरगांवकर व त्यातील विद्या भवनास ` प्रभाकरपंत कोरगांवकर ` या दांपत्याचे नाव त्यांनी दिले. ` सुमारे तीस लाखांच्या या इमारतीस कोरगांवकराकडून मोठी देणगी वगैरे मिळाली का ? असा नाईक यांना प्रश्न केला असता ते म्हणाले ` त्यांनी देणगी देण्याचा प्रश्नच येत नाही. प्रभाकरपंत व त्यांच्या कुटुंबीयांनी आपल्या हयातीत ट्रस्टमार्फत व स्वत: समाजाकरिता एवढं काही केले आहे की त्यांचं ऋण सार्वजनिकरित्या मान्य केलच पाहिजे.त्या भावनेनं मी ही नावे आपणहून दिली आहेत.[१]

महात्मा ज्योतिबा फुले यांचे ` व्यक्तित्व आणि विचार ` हे पुस्तक सर्व समाजाला अगदी नाममात्र किंमतीत उपलब्ध व्हावे म्हणून प्रा.गं.बा. सरदार यांच्याकडून असे चरित्र लिहून घेण्यात आले व ट्रस्टतर्फे सर्व खर्च करुन १९८१ मध्ये ते प्रसिध्द करण्यात आले.

मे १९८१ मध्ये ` महाराष्ट्रातील राजकीय,आर्थिक व सामाजिक परिवर्तन ` या विषयावर श्री.एस.एम.जोशी यांची दोन व्याख्याने घडवून आणली यावेळी म्हणजे दि.१६ व १७ मे १९८१ ला नाईक कोल्हापूरात आले हीच त्यांची कोल्हापूरची अखेरची भेट ठरली.

जे.पी.नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील योजना राबविण्यात आली --

गोपुरी योजना --

गोपुरी योजना ( कणकवली, जि.रत्नागिरी ) येथे राबविण्यात आली. सांगलवाडी येथे निसर्ग उपचार केन्द्र ,डॉ.कृष्णाबाई केतकर यांच्या मदतीने चालविली गेली. मौनी विद्यापीठात गारगोटी ,कडगांव,पाटगांव, पिंपळगांव या चार ठिकाणी ग्रामसेवा केन्द्रे स्थापन करुन १९५२-१९५४ मध्ये ही केन्द्रे चालविण्यात आलेली आहेत. शिवाय या ट्रस्ट मार्फत अनेक संस्थाना अधिकाधिक मदत देण्यात आली.[१०]

मौनी विद्यापीठाकडून खालील शिक्षण संस्था चालविण्यास सुरुवात झाली.

१) श्री गोविंदराव कोरगांवकर ग्रामीण शिक्षण भवन ( पुणे विद्यापीठ - संलग्न )

२) अध्यापक भवन - डि.एड.,

३) कुमार भवन (शेती शिक्षण देणारी ) माध्यमिक शाळा

४) बालभवन ( प्राथमिक शाळा )

५) हरिजन विद्यार्थी वसतिगृह

६) जनता घर (ग्रामीण पुनर्घटनेचे व प्रौढ शिक्षणाचे केन्द्र )

७) स्त्री विभाग .

गारगोटीस पांच मैलांच्या परिसरात असलेल्या खेड्यामध्ये ग्रामीण पुनर्घटनेच्या कार्यक्रमाला १९५३ पासून सुरुवात झाली.

दुष्काळग्रस्ताना व आपदग्रस्तांना सहाय्य --

दुष्काळाच्या काळात कोल्हापूर शहरास अत्यंत स्वस्त जोंधळा पुरविण्यात येत असे यासाठी लाखो रुपये खर्च केले गेले.

भाजी भाकर केन्द्र --

सध्या रेल्वे स्टेशन समोर, मेन एस.टी. स्टॅन्डसमोर, सी.पी.आर. हॉस्पिटल आवार, रंकाळा वेस स्टॅण्ड येथे रोज शेकडो गरीब व गरजू किंबहुना मध्यमवर्गीय ग्राहकासाठी भाजी-भाकर केन्द्र सुरु करण्यात आले.

कमी पैशात मिळणारी माजी माकरी लोकप्रिय होऊन अधिक केन्द्रे उघडण्याची मागणी होत आहे. या उपक्रमास प्रतिवर्षी हजारोंचा तोटा संस्थेस सहन करावा लागत आहे. दिवाळीत कमी दरात मिठाई विक्री करणे, १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दिवशी स्वस्त दरात जिलेबी विकणे सुरु करण्यात आले होते.

छ.शाहू ब्लड बँक व वाचा बंधिर केन्द्र कोरगांवकर संस्थेमार्फत आपल्या मालकीची जागा देऊन संस्था उभारण्यास सहाय्य केले.

शिबिरे व प्रबोधन संस्था पुणे - आधुनिक पुरोगामी विचार प्रचार व प्रसार याचा कार्यक्रम राबविणाऱ्या संस्थेस ट्रस्टने आतापर्यन्त ४८ हजारावर मदत केली आहे.

हिंद कन्या छात्रालय - कोल्हापूर --

मागासवर्गीय विद्यार्थिनींचे वसतिगृह, कोरगांवकर ट्रस्टतर्फे सन १९४८ सालापासून चालविण्यात येते. समाज कल्याण खात्यातर्फे मान्यता व अनुदानही मिळते. आतापर्यन्त या संस्थेतून शेंकडो मुली शिकून बाहेर पडल्या आहेत. जीवनात स्थिरावल्या आहेत. संस्थेत मुलींना जेवण, निवास, कपडे लत्ते, शालेय सुविधा देतात व हुशार मुलींना एस.एस.सी. नंतर शिक्षणास मदत केली जाते. काही मुलींचे संस्थेने विवाहही लावून दिले आहेत.

विनयकुमार छात्रालय - कोल्हापूर --

मागासवर्गीय मुलांचे हे वसतिगृह सन १९६२ मध्ये सुरु केले असून समाज कल्याण खात्यातर्फे मान्यता व अनुदान मिळाले. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. आतापर्यन्त अनेक विद्यार्थी या संस्थेतून बाहेर पडले असून ते विविध क्षेत्रात कामकरीत आहेत.

विविध कार्यक्रमासाठी गेल्या ४० वर्षात पाऊण कोटी रुपये खर्च करण्यात आला. कोरगांवकर कुटुंबिय अपुरा पडलेला प्रकल्प पूर्ण करण्याकरिता स्वत: जवळील आर्थिक मदत करुन पूर्ण करतात.

अशा या कोरगांवकर संस्थेत भक्कम पाया जे.पी.नाईक यांनी घातला व या संस्थेस मौलिक सल्लाही वारंवार दिला, त्यामुळे या संस्थेचा उत्कर्ष घडू शकला.

भारतातील शैक्षणिक पुनर्घटनेला चालना देण्याच्या हेतूने श्री.गोविंदराव कोरगांवकर धर्मादाय संस्थेच्या वतीने एक शिक्षण परिषद कोल्हापूर येथे १८,१९,२० मे १९५३ रोजी जे.पी.नाईक यांच्या पुढाकाराने भरविण्यात आली होती. उद्घाटन श्री.शंकरावजी देव यांनी केले. अध्यक्ष म्हणून आचार्य स.ज. भागवत याची निवड करण्यात आली. आणि यात ग्रामीण प्रश्नावर चर्चा होऊन भारतीय शिक्षण विचार मंडळ या नवीन संस्थेची स्थापना करण्यात आली.

सेवक संघ नेमून स्नेहसंम्मेलने भरविण्यात आली.

जे.पी.नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आणखी काही संस्थाना मदत केली.

इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन,पुणे -- हा आंतरभारती शिक्षण मंडळातर्फे चालविल्या जाणाऱ्या प्रशाळेच्या ईमारती करता दोन लाखावर देणगी दिली.

मातृमंदिर देवरुख - कोंकणातील या सुप्रसिध्द आरोग्य सेवाभावी संस्थेस यापूर्वी भरपूर अर्थ सहाय्य केले आजही दर महिन्यास रक्कम जाते.

शिवाजी विद्यापीठ - विद्यापीठास २५ हजार रुपये देणगी दिली. प्रतिवर्षी व्याख्यानमाला व एम.कॉम.च्या दोन विद्यार्थ्यास दोन पारितोषिके देण्यात येतात. आज पर्यन्त न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, डॉ.य.दि.फडके, भाई वैद्य,प्राचार्य जनार्दन वाघमारे, याची व्याख्याने झाली आहेत.

वेंगुर्ली वाचनालय - या संस्थेस ५१ हजाराची देणगी देण्यात आली आहे.

माध्यमकि मुख्याध्यापक संघास १००१ चे पारितोषिक देण्यात आले.[११] माध्यमिक शाळांना १२वी परीक्षेत गुणवत्ता यादीमध्ये विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात येते. पुणे विभागीय मंडळाकडे पारितोषिक ठेवली आहेत.

कर्नाटक आरोग्य धामास अर्थ सहाय्य करण्यात आले.

गरजू विद्यार्थ्यांना सुमारे २० हजार दरवर्षी खर्च केले जातात.

महिला दक्षता समिती -- कोल्हापूर या संस्थेतर्फे महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक केली जाते तिला लागणारा निधी, सभागृह फर्निचर, टाइपरायटर, फोन इ.सुविधा कोरगांवकर ट्रस्टने पुरविला . आजपर्यन्त अनेक स्त्रियांनी यांचा लाभ घेतला आहे.

कोरगांवकर सांस्कृतिक केन्द्र --

माकडवाला वसाहतीला भटका व विमुक्त समाज विकास मंडळातर्फे चालविल्या जाणाऱ्या बालवाडी व्यायाम शाळा इ.उपक्रमास भरीव सहाय्य करण्यात आले.[१२]

मानधनाचे मानकरी --

महाराष्ट्रातील नामवंत कार्यकर्ते कोरगांवकर ट्रस्टचे मानधन स्वीकारलेल्या व्यक्ती पैकी कै.शंकरराव देव, साथी एस.एम.जोशी, आण्णासाहेब सहस्त्रबुध्दे, कै.माधवराव बागल, कै.जे.पी.नाईक यांचा यात समावेश आहे. तर कार्यकर्ते म्हणून वसंतराव व कुसुमताई नारगोळकर, श्री यदूनाथ थत्ते इ.मंडळी आहेत. गेल्या ४० वर्षात मानधनावर ६ लाखावर खर्च झाला आहे.

जे.पी.नाईक व मौनी विद्यापीठ --

ग्रामीण विद्यापीठाची कल्पना जे.पी.नाईक यांच्या मनात बरेच दिवस घोळत होती. कोल्हापूरात परत आल्यावर त्यानी गडहिंग्लज ( जि:कोल्हापूर ) तालुक्यातील कडगाव या ठिकाणी आपल्या जन्मगावाजवळ (बहिरेवाडी ) व त्या परिसरात ग्रामीण विद्यापीठ काढण्याची योजना गडहिंग्लजच्या विचारवंत, पुढारी वगैरेपुढे मांडली पण दुर्दैवाने त्या भागातील लोकांनी योग्य प्रतिसाद दिला नाही. मग ती योजना त्या वेळचे इलाखा पंचायतीचे अध्यक्ष व प्रिन्स एज्युकेशन सोसायटी कोल्हापूर या संस्थेचे अध्यक्ष श्री.व्ही.टी.पाटील या शिक्षण व्यक्तीस नाईक यांनी आपली

योजना समजाऊन सांगितली.त्यांना ती पटली व अखेर गारगोटी (जि.कोल्हापूर ) येथे मौनी विद्यापीठ नावाची महत्वकांक्षी शिक्षण प्रयोग शाळेची स्थापना सन १९५२ मध्ये करण्यात आली.[१३]

या विद्यापीठाचे १) प्रिन्स एज्युकेशन सोसायटी २) इंस्टिटयूट ऑफ एज्युकेशन ,मुंबई ३) कोरगांवकर धर्मादाय संस्था,कोल्हापूर असे तीन घटक ठरविण्यात आले. नाईक हे विद्यापीठाचे डायरेक्टर व सेक्रेटरी म्हणून काम करु लागले.

ग्रामीण विभागात पूर्व प्राथमिक पासून ते विश्वविद्यालयीन शिक्षणापर्यन्तच्या ग्रामीण जीवनास आवश्यक असलेल्या सर्व दर्जाच्या व सर्व तऱ्हेच्या शिक्षण संस्था स्थापन करुन त्या चालविणे या कार्यक्षेत्रातील प्रत्येक खेड्यामध्ये शिक्षण व पुर्नघटन याची संयुक्त केन्द्रे स्थापणे, ग्रामीण जीवनास उपयुक्त असे निरनिराळे प्रयोग व संशोधन करणे,संपूर्ण असंप्रदायिक पध्दतीने ग्रामीण शिक्षणातील निरनिराळ्या समस्या उकलण्याचा प्रयत्न करणे, त्या विभागातील जनतेच्या जीवनाचा दर्जा सुधारणे इ.उच्च प्रकारचे ध्येय व हेतू डोळ्यासमोर ठेऊन हे विद्यापीठ स्थापन करण्यात आले. त्याला ग्रामीण विद्यापीठाचा पूर्व प्रयोग ( **a pilot project for a rural University** ) असे म्हणता येईल.

जे.पी.नाईक हे सन १९४२ पासूनच कोल्हापूरच्या रिजन्सी कौन्सिलमध्ये शिक्षण सचिव म्हणून काम करत होते. तेव्हापासून व्ही.टी.पाटील व जे.पी.नाईक यांच्यात मैत्री जुळली. रिजन्सी कौन्सिलचे ताराराणी विद्यापीठ व श्री मौनी विद्यापीठ या दोन संस्थासाठी जागा मिळवून दिली या कामी नाईक यांनी व्ही.टी.पाटील यांना खूप मदत झाली.

नाईक मुंबईस गेले. त्यानी इंडियन इंस्टिटयूट ऑफ एज्युकेशन ही १९४२ मध्ये संस्था उभारली पण त्याचा जीव रमेना म्हणून सन १९५२ साली ते कोल्हापूरला परत आले व व्ही.टी.पाटील यांनी नाईक यांना श्री मौनी विद्यामंदिरात सहभागी करुन घेतले. सन १९५२ श्री मौनी विद्यामंदिराचे

श्री मौनी विद्यापीठ असे नामनिधान केले गेले.[१४]

## मौनी विद्यापीठाच्या उभारणीत जे.पी.नाईक यांचा सहभाग --

श्री मौनी विद्यापीठाची जबाबदारी संस्थेचे संस्थापक खासदार व्ही.टी.पाटील व इस्टेट डायरेक्टर व जनरल सेक्रेटरी करुन नाईक यांच्यावर जबाबदारी टाकली.नेहमीच्या स्वभावाप्रमाणे त्यानी या कामालाही सर्वस्वी वाहून घेतले. सरकारकडून लाखो रुपयाची देणगी मिळविली.त्यात स्वत:चाही पगार घातला.' एक रात्रीत नव सृष्टी निर्माण करण्याच्या महत्वकांक्षेने त्या पठारावर शैक्षणिक वसाहत उभी केली. छोटया मोठ्या ईमारतीचा अफाट पसारा वाढवला.'[१५] त्याच्या प्रयत्नामुळे लायब्ररी ही एक अनमोल अशी संस्था निर्माण झाली व त्या संस्थेला अखिल भारतीय दर्जा प्राप्त करुन दिला.

मौनी विद्यापीठ येथे आचार्य स.ज.भागवत यांच्या बरोबर काम करताना सामाजिक विकास विषयी आचार्य भागवतांच्या विचारांचा त्यांच्या मनावर खूपच प्रभाव पडला.[१६]

राधाकृष्ण कमिशनच्या अहवालाप्रमाणे भारतातल्या ग्रामीण भागातील लोकांच्या शिक्षणसंबंधाचे विचार करुन मौनी विद्यापीठ स्थापन झाले. शिक्षण क्षेत्रातील अनेक समस्या सोडविण्याच्यादृष्टीने या अहवालात विचार करण्यात आला आहे. व त्या काळात भारतात दहा ग्रामीण शिक्षण देणाऱ्या संस्था ( विद्यापीठ ) निर्माण झाल्या. उदा.जामीया मिलिया विद्यापीठ, दिल्ली,गांधी ग्रामीण ,मदुराई, मद्रास,पंजाबराव देशमुख विद्यालय,अमरावती,इन्स्टिटयूट ऑफ रुरल एज्युकेशन,इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ इत्यादि या धरतीवर मौनी विद्यापीठास शिक्षणाबरोबर खेडूतांच्या जीवनाशी संबंधित असलेल्या अनेक समस्याची सोडवणूक करण्यास या विद्यापीठाने प्रयत्न केले. शिक्षणातून विकास ,विकासातून शिक्षण हे या विद्यापीठाचे ध्येय वाक्य होय.त्यासाठी निवासी ग्रामीण विद्यापीठ स्थापन व्हावे आणि ते शहरापासून दूर असावे या दृष्टीने जे.पी.नाईक प्रयत्नशील होते.

बालवाडी पासून पीएच.डी.पर्यन्त सर्व स्तरांचे शिक्षण येथे दिले जाण्याची सोय केली आहे. प्राध्यापक शिक्षक निवासी सोय आहे. दहा हजाराहून अधिक विद्यार्थी सध्या या विद्यापीठात शिक्षण घेतात. ६५ एकर विस्तार आहे हे विद्यापीठ म्हणजे शिक्षणामध्ये जे.पी.नाईक यांची प्रयोगशाळा होती.

या विद्यापीठातील मिळालेल्या अनुभवाच्या आधारे भारत सरकारने केन्द्र सरकारला शिक्षण सल्लागार म्हणून त्याची नियुक्ती नंतर केली. गारगोटी परिसराचा विकास व्हावा म्हणून त्यानी अनेक शैक्षणिक कार्यक्रम राबवले. आणि सुरुवातीच्या शैक्षणिक योजना त्याच्याच मार्गदर्शनाखाली तयार झाल्या,त्याची सर्व साधारण माहिती पुढीलप्रमाणे--

१) मौनी विद्यापीठाची स्थापना --

महाराष्ट्राच्या मागासलेल्या एका कोपऱ्यात असणाऱ्या भुदरगड व राधानगरी तालुक्यातील खेड्यामध्ये ग्रामीण शिक्षण व ग्रामीण पुर्नरचना याचे कार्य करणारे हे एक केन्द्र आहे. विद्यापीठातर्फे आसपासच्या ३१ लहान खेड्यात प्राथमिक शाळा चालविल्या जातात व ग्रामीण कल्याण, समाज विकास कार्यात ही संस्था सहभागी होते.

स्थापना --

गारगोटीमध्ये ग्रामीण शिक्षणाचे एक केन्द्र स्थापन करण्याची कल्पना विद्यापीठाचे अध्यक्ष श्री व्ही.टी.पाटील यांना प्रथम सन १९४५ साली सुचली.सध्या विद्यापीठ ज्या ठिकाणी आहे ती २५ एकराची जागा कोल्हापूर सरकारच्या मदतीने त्या वेळी मिळविण्यात आली. आणि जून १९४६ मध्ये गारगोटी येथे श्री मौनी विद्यामंदिर नावाची माध्यमिक इंग्रजी शाळा सुरु करण्यात आली.

२) अत्यंत प्राचिन काळी गारगोटीचे नाव "गार्ग्यकुटी" असे होते कारण या गावाजवळून वाहणाऱ्या वेदगंगा नदीच्या काठी गार्ग्य ऋषीची कुटी (झोपडी ) होती.गार्ग्य ऋषीचा आश्रम नाहीसा झाल्यानंतर या खेड्याची

शैक्षणिक प्रवृत्ति सुप्तावस्थेतच राहिली. पुढे १७व्या शतकात या भागामध्ये श्री मौनी महाराजांचे आगमन झाले.[१७] ते एक आदरणीय संत व छत्रपति शिवाजी महाराजांचे एक गुरु होते. त्यानी या प्रदेशांतील जनतेला शिक्षण देऊन त्या जुन्या लुप्त प्रवृत्तीला जागृत करण्याचा प्रयत्न चालविला. परंतु त्याबद्दल त्यांना भयंकर छळ सोसावा लागला की अखेर त्यानी मौनव्रत धारण करावे लागले. अशा सत्पुरुषाचे नांव विद्यापीठाने स्वत:साठी घेतले आहे. आणि जनतेची सेवा करण्याचे व तिला शिक्षण देण्याचे त्याचे काम पुढे चालविण्याचे कंकण बांधले आहे.

३) सन १९५२ पर्यन्त ग्रामीण शिक्षणाच्या या प्रयोगाची प्रगति काहीशी मंद होती. परंतु त्या वर्षी श्री.प्रिन्स शिवाजी एज्युकेशन सोसायटी ,कोल्हापूर व इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन, मुंबई या ग्रामीण शिक्षणात गोडी असणाऱ्या तीन संस्था हा प्रयोग यशस्वी करण्यासाठी एकत्र आल्या. त्यानी आपापसात चर्चा व विचारविनिमय करुन ग्रामीण शिक्षणाची एक व्यापक योजना बनविली. आणि ती अंमलात आणणाऱ्या या केन्द्राला श्री मौनी विद्यापीठ असे नाव दिले. त्या नावाने एक विश्वस्त निधि (ट्रस्ट ) ही तयार करण्यात आला. या विद्यापीठाचा कारभार एका कार्यकारी मंडळाकडे सोपविण्यात आला. या मंडळाचे बहुतेक सभासद वरील तीन संस्थानी नेमलेले असावेत असे ठरले होते. जे.पी.नाईक यापैकीच एक होते.

<u>मौनी विद्यापीठाची उद्दिष्ट्ये --</u>

१) अस्सल ग्रामीण भागामध्ये एक विविधांगी शैक्षणिक केन्द्र निर्माण करणे. या केन्द्रातर्फे शिक्षणाच्या द्वारे पुनर्रचना व पुनर्रचनेच्या द्वारे शिक्षण या पध्दतीने ग्रामीण लोकांच्या जीवनात नवचैतन्य आणण्याच्यादृष्टीने काम करणे.

२) वरील उद्दिष्ट्ये साध्य करण्याकरिता विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात एक सुशिक्षित समाज निर्माण करणे, हा समाज म्हणजे एकत्र काम करणारे शिक्षक व विद्यार्थी या सहकारी संघ असेल.

३)  प्रत्यक्ष उदाहरणाने व शिक्षणाने विद्यापीठातील व समोवतालच्या प्रदेशांतील लोकांच्या मनातून धर्म व जात जीवनमान, शैक्षणिक लायकी, पदाधिकार,कामाचे स्वरुप व दर्जा आणि अशाच इतर गोष्टी यांच्या बाबतीत माणसामाणसांत निर्माण होणारे सारे कृत्रिम भेदभाव दूर करणे. कारण या गोष्टीमुळे मानवाच्या मूलभूत प्रतिष्ठेत आणि त्याच्या बुध्दीच्या व अंत:करणाच्या गुणांमध्ये भर पडत नाही अथवा उणेपणाही येत नाही.

४)  सर्व प्रकारच्या विचार आचाराच्या द्वारे प्रत्येक जण सर्वांसाठी आहे आणि सर्वजण प्रत्येकासाठी आहेत या सुसंस्कृत मानवी जीवनाच्या मूलभूत सिध्दान्ताची अभिव्यक्ति करणे व आदरपूर्वक त्याचे रक्षण करणे ही उद्दिष्टये आहेत.

३)  <u>बोधचिन्ह व बोधवाक्य</u> --

या विद्यापीठाचे बोधचिन्ह प्रकाशमय दिवसाकडे चाललेल्या ग्रामीण जीवनाचे प्रतीक आहे. त्यामध्ये समोवतालच्या पानांमधून व धान्याच्या लोंब्यामधून नवप्रकाश पसरविणारा सूर्य उगवत असलेला दिसतो. तिच्या काठांवर शेती असून तेथे एक शेतकरी उत्साहाने जमिन नागरत आहे व त्या नागराला दोन उत्कृष्ट बैल जोडलेले आहेत. बोधचिन्हांच्या शिरोभागी मानवाचे अंतिम ध्येय जी शांति तिचा उद्‌बोध करण्यात आलेला आहे. ही शांति प्राप्त झाल्यानंतर माणूस असे म्हणू शकतो की शान्तोऽयमात्मा ( माझा आत्माशांत आहे ) बोधचिन्हाच्या खालच्या बाजूस मानवाचे हे ध्येय प्राप्त करण्याची साधने ज्ञान,सेवा,त्याग या शब्दाची सूचित करण्यात आलेली आहेत. ज्ञान हे मानव व त्याच्या समोवतालची परिस्थिती याच्यामधील संघर्ष नाहीसा करते. सेवेमुळे माणसा - माणसातील संघर्ष नाहीसा होतो. आणि त्यागामुळे माणसाच्या स्वत:च्या मनातील संघर्ष नाहीसे होतात. जीवनातील हे सारे संघर्ष मिटले की मानवाला मन:शांती

लागते. हेच तर मानवाचे मनोवंछित ध्येय असते. आपल्या कर्मचाऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी हे ध्येय साध्य करण्याकरिता जगाचे व काम करावे म्हणून विद्यापीठ त्याना नेहमी आपल्याकडून सहाय्य देत राहिल.' [१८]

मौनी विद्यापीठामार्फत - जे.पी.नाईक यांनी पुढील कार्यक्रम राबविले --

आजही खालील संस्था कार्य करत आहेत.

सौ.लक्ष्मीबाई कोरगांवकर शिशु भवन --

पूर्व प्राथमिक शाळा यातूनच पुढे ग्रामीण बालकांच्या बाबतीत मार्गदर्शन करणारे केन्द्र विकसित झाले. आणि नियोजित पूर्व प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षण केन्द्रासाठी (प्रि-प्रायमरी टिचर्स ट्रेनिंग इंस्टिटयूट साठी ) आदर्श सराव शाळा ( प्रेक्टिसिंग स्कूल ) म्हणून या शिशु भवनाचा उपयोग केला गेला.

जवाहर बाल भवन --

मराठी पाचवी ते ७वी पर्यन्तचे वर्ग येथे चालतात. प्राथमिक शाळान्त परीक्षेला या शाळेतील सातवीचे विद्यार्थी बसतात. इयत्ता १ली पासून चौथी पर्यन्तचे शिक्षण एका वर्गात देणारी एक प्रयोगात्मक एक - शिक्षकी शाळाही या विद्यालयात जोडण्यात आलेली आहे.

शाहू कुमार भवन --

विद्यापीठीय ( अॅकेडेमिक ) शेतीचे व तांत्रिक शिक्षण देणारे विविधोद्देशी माध्यमिक विद्यालय,येथील विद्यार्थी माध्यमिक शाळान्त परीक्षेला (एस.एस.सी. ला ) बसतात. शाळेतील काही विद्यार्थी वसतिगृहात राहातात.

उदाजीराव अध्यापक भवन --

प्राथमिक शिक्षकासाठी प्रशिक्षण महाविद्यालय ( प्रायमरी ट्रेनिंग कॉलेज ) यात दोन विभाग आहेत --

अ) प्राथमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्यासाठी कनिष्ठ प्रमाणपत्र अभ्यासक्रम ( ज्युनियर सर्टिफिकेट कोर्स ) व

ब) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्यासाठी वरिष्ठ प्रमाणपत्र अभ्यासक्रम ( सिनियर सर्टिफिकेट कोर्स ) या प्रशिक्षण महाविद्यालयाकडे खेड्यातील शिक्षणविषयक विशेषत: प्राथमिक शिक्षणासंबंधी विस्तार कार्याची जबाबदारी असते. ही संस्था वसतिगृहात्मक आहे.[१९]

श्री मौनी विद्यापीठ ग्रामभारती ( रुरल इन्स्टिटयूट ) विद्यापीठातील सर्वांत महत्वाची संस्था विश्वविद्यालयाच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या महाविद्यालयाच्या पातळीवरुन संस्था काम करते. यामध्ये दोन विभाग आहेत.

(१) डिप्लोमा इन रुरल सर्व्हिसेस

(२) डिप्लोमा इन सिव्हिल अँण्ड रुरल इंजिनियरिंग, हे डिप्लामा(सनदा) मध्यवर्ती सरकारने सुरु केलेले असून भारतातील कोणत्याही कायदेशीर विद्यापीठाच्या बी.ए.च्या तोडीचे ते आहेत. अशी मान्यता मध्यवर्ती सरकारकडून त्याना मिळालेली आहे. ग्रामीण लोकांमध्ये जीवनाच्या सर्व क्षेत्रांशी संबंध असलेले विस्तार कार्य हे या संस्थेचे एक प्रमुख काम आहे. हे काम संस्थेच्या अध्यापकानी कराव्याच्या संशोधनाच्या पायावर आधारलेले असावे अशी अपेक्षा आहे ही संस्था वसतिगृहात्मक आहे.

आचार्य जावडेकर विनय भवन --

पदवीधर शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे महाविद्यालय - माध्यमिक मूलोद्योगी शालांतून आणि मूलोद्योग प्राथमिक प्रशिक्षण महाविद्यालयातून कसे शिकवावे याचे प्रशिक्षण या संस्थेत दिले जाते. येथील शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर डी.एड.(डिप्लोमा इन एज्युकेशन ) हा डिप्लोमा ( सनदा ) देण्यात येतात. हा डिप्लोमा भारतातील कोणत्याही कायदेशिर विद्यापीठाच्या बी.टी.किंवा बी.एड.या पदव्याच्या बरोबरीचा होता. या संस्थेकडून ग्रामीण विभागात विस्तार कार्य केले जाते ही अपेक्षा होती ही संस्था वसतिगृहात्मक आहे.

गोविंदराव कोरगांवकर ग्रामीण शिक्षण भवन --

विद्यापीठाच्या पदव्युत्तर संशोधन विभाग, या संस्थेतर्फे मुख्यत: ग्रामीण शिक्षणाच्या बाबतीत संशोधन करण्यात येते. पुणे विद्यापीठाच्या एम.एड.व पीएच.डी. या पदव्यासाठी संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. ग्रामीण शिक्षण व ग्रामीण विकास यांची चर्चा करणारे ग्रामीण शिक्षण नावाचे त्रैमासिक चालविले जाते. आणि शिक्षण,समाज विकास याचा संबंध असलेले इतर विषय यावर पुस्तके तयार करुन प्रकाशित केली जातात. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या घटक संस्थातर्फे हाती घेण्यात यावयाच्या संशोधनात्मक कार्याची आखणी व मार्गदर्शन करण्याच्या कामीही या शिक्षण भवनाने मदत करावयाची असते. सर्व संस्थाना शिक्षणाच्या बाबतीत तात्विक मार्गदर्शन करणे व त्याच्या कामाचे मूल्यमापन करणे हेही या संस्थेचे काम आहे.

समाज शिक्षण संघटकाचे प्रशिक्षण केन्द्र --

हे केन्द्र मध्यवर्ती सरकारच्या समाज विकास मंत्रालयाच्यावतीने चालविण्यात येते. जानेवारी १९५९ पर्यन्त या केन्द्रामध्ये वर्षातून प्रत्येकी पाच महिन्याचे असे दोन वर्ग चालविले जात. या वर्गात वेगवेगळ्या राज्य सरकारांनी पाठविलेले स्त्री-पुरुष समाज शिक्षण संघटक प्रशिक्षण घेत व त्यानंतर केन्द्रातर्फे पुरुष समाज शिक्षण संघटक व केन्द्रिय समाज कल्याण मंडळाच्या मुख्य सेविका यांना प्रशिक्षण देणारे वर्ग चालविण्यात येऊ लागले. ग्रामीण समाज विकास व विस्तार सेवा संघटना याच्या बाबतीत या केन्द्राच्या द्वारे महत्वाचे संशोधन व्हावे अशी अपेक्षा आहे. केन्द्र पूर्णपणे वसतिगृहात्मक असून पुरुष व स्त्रिया यांच्यासाठी वेगवेगळी वसतिगृहे आहेत.

प्रौढ महिलांचा प्राथमिक शिक्षण वर्ग --

३१ मार्च १९५९ पासून सुरुवात. किमान चार मराठी इयत्तापर्यन्त शिक्षण झालेल्या प्रौढ व गरजू स्त्रियांना दोन वर्षात प्राथमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण होता येईल इतके शिक्षण या वर्गात दिले जाते. प्रत्येक विद्यार्थिनीचा खर्च मागेल एवढी शिष्यवृत्ती दिली जाते.

तलाठी व ग्रामपंचायत चिटणीस यांचे प्रशिक्षण --

२० एप्रिल १९५९ पासून केन्द्र सुरु करण्यात आले. १०० तलाठ्यांना सध्या ग्रामपंचायत कामाचे शिक्षण दिले जाते.

या शिवाय आनुषंगिक कार्यक्रम राबविले जातात[२०] --

महिला मंडळ, समाज कल्याण प्रकल्प, आरोग्य कार्यक्रम, श्री मौनी पंचायत यात पाणीपुरवठा, दिवाबत्ती, सफाई, रस्त्याची दुरुस्ती वगैरे कामे पंचायत करते. शेती व बाग विभागामार्फत विद्यापीठ आवारातील शेती व बाग कामाचे संयोजन अंमलबजावणी व एकसुत्रीकरण केले जाते. शेती विस्तार कार्य राबविला जातो.

सामूहिक प्रार्थना --

येथे राहणाऱ्या लोकांमध्ये समाज भावना जागृत व्हावी व टिकावी व त्यांना अनौपचारिकपणे एकमेकांना भेटता यावे म्हणून साप्ताहिक प्रार्थनेचा कार्यक्रम योजलेला आहे.

गारगोटीच्या बाहेरील नानाविध व्यक्ती व समूह यांच्याशी विद्यापीठातील लोकांचे स्नेहभाव निर्माण करण्यासाठी स्वतंत्र अतिथिगृह आहे. कर्मचारी किंवा अन्य भोजनगृहाच्या मार्फत जेवण पुरविले जाते.

विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त साधने व सोई आहेत.

ग्रंथालय --

इंग्रजी व मराठी दोन विभाग व हिन्दी या विषयाची पुस्तकेही आहेत. शिक्षण समाजशास्त्र समाज विकास व विस्तार कार्य यांच्यासंबंधी उत्कृष्ट संग्रह आहे.

सकाळी ८ ते दुपारी १२-००

दुपारी २ ते रात्री १० याची वेळ आहे.

मनोरंजन --

क्रीडांगण प्रशस्त पाश्चात्य व देशी खेळ, वैयक्तिक व सांघिक खेळ घेतले जातात. भरपूर साहित्य उपलब्ध आहे.

ज्यांना नाट्य संगित लोकगीते याची आवड असणाऱ्यासाठी साधने व आनंदासाठी सोई उपलब्ध करुन दिल्या जातात. नाटकांचे व मनोरंजन प्रयोग विद्यार्थी करतात.

कलेस व हस्तकलेस उत्तेजन --

दृक्श्राव्य साधन विभागात प्रोजेक्टर्स, चलचित्रपट, स्थिर चित्रपट, तक्ते भित्तिपत्रे, नमुने, दूरध्वनीदोपक सर्व दृक्श्राव्य साहित्य तयार आहे.

विद्यार्थी गरीब व लायक असेल तर अध्यायनासाठी मदत केली जाते.[२१]

आर्थिक कार्यक्रम

सहकारी भांडार, उपाहार गृह, बांधकाम विभाग, सुतार काम विभाग, सार्वजनिक माध्याच्या ईमारती, डाक-तार कचेरी, बैन्का यांना ईमारती बांधून माध्याने दिलेल्या आहेत. कुक्कुटपालन विभाग चालविला जातो.

विस्तार कार्यक्रम -

शिक्षणाद्वारे पुनर्रचना व पुनर्रचनेद्वारे शिक्षण साध्य करण्यासाठी विविधांगी सुनियोजित व सुसूत्र शैक्षणिक व आर्थिक विकासाच्या द्वारेच राबविण्याचा प्रयत्न केला जातो.

१) औपचारिक - शिक्षण - साक्षरता मोहिम
२) मनोरंजनात्मक व सांस्कृतिक कार्यक्रम
३) कला व हस्तकला उद्योग धन्दे यांचे प्रशिक्षण
४) आरोग्य स्वच्छता कार्यक्रम

ब) <u>औपचारिक व अनौपचारिक संघटनांना मार्गदर्शन व शैक्षणिक मदत करणे</u> -

या सर्व कार्यक्रमास जे. पी.नाईक यांनी सतत मार्गदर्शन केले.

ग्रामीण विभागात पूर्व प्राथमिक ते विश्वविद्यालयीन शिक्षणापर्यन्तच्या ग्रामीण जीवनास आवश्यक असलेल्या सर्व दर्जाच्या व सर्व त-हेच्या शिक्षण संस्था स्थापून त्या चालविणे. या कार्यक्षेत्रातील प्रत्येक खेड्यामध्ये शिक्षण व पुनर्घटना याची संयुक्त केन्द्रे स्थापणे. ग्रामीण जीवनास उपयुक्त निरनिराळे प्रयोग व संशोधन करणे. शिक्षण विषयक समस्याची उकल करणे. विभागातील लोकांचा दर्जा सुधारणे हे ध्येय व धोरण असल्याने ग्रामीण विद्यापीठाचा पूर्वप्रयोग,नाईक यांनी मौनी विद्यापीठात केला.

माई बागल यांच्या मते ---

' ते डायरेक्टर व जनरल सेक्रेटरी म्हणून काम करु लागले. नेहमीच्या स्वभावाप्रमाणे त्यांनी या कार्याला सर्वस्वी वाहून घेतले. किती श्रम करतील याचे मोजमाप व्यवहारी ताजव्यात तोलता येणार नाही. मध्यवर्ती सरकारकडून लाखो रुपये मिळवून आणले. स्वत:चा पगारही संस्थेतच घातला. श्रम,बुध्दि व घाम ओतला.एका रात्रीत नवसृष्टि निर्माण करण्याच्या उमदीने त्या पठारावर शैक्षणिक वसाहत उभी केली. छोटया मोठ्या ईमारतीचा अफाट पसारा वाढविला पण जे.पी.ना तितकी कलादृष्टी नसल्यामुळे त्या ईमारती सौन्दर्याच्यादृष्टीने आकर्षक झाल्या नाहीत. उपयुक्त झाल्या नि:संशय त्याच्या खटपटीने तेथील लायब्ररी ही एक अमोल अशी संस्था निर्माण झाली. विद्यापीठाला अखिल भारतीय दर्जा प्राप्त

करुन दिला. त्यामुळे मौनी विद्यापीठाला भारतातील शिक्षण तज्ज्ञ भेटी देत असतात.`२३

अशारीतीने कोल्हापूर जिल्ह्यात मौनी विद्यापीठ गारगोटी व कोरगांवकर धर्मादाय संस्था कोल्हापूर आज नावारुपाला आलेल्या असून शैक्षणिक व सामाजिक कार्य करीत आहेत. ह्या दोन संस्थाच्या स्थापनेत संवर्धनात व स्थैर्य आणण्यासाठी जे.पी.नाईक अहोरात्र झटले म्हणून जे.पी. नाईक यांचे ऋण या संस्था कधिच विसरु शकणार नाहीत.

## संदर्भ ग्रंथ सूची


१ कोरगांवकर संस्थेचा संक्षिप्त परिचय - पत्रक

२ जोशी बाबूराव - कोल्हापूरचे जे.पी.नाईक - पृ.७५

३ डॉ.माळी मा.गो. - प्राचार्य - सातळेकर अरविंद - एक देवाघरच लेण-पृ.६९

४ कोरगांवकर ट्रस्ट या संस्था - परिचय - अहवाल -

५ जोशी बाबूराव - कोल्हापूरचे जे.पी.नाईक - पृ.७६

६ बागल माई माधवराव - माझा परिवार - पृ.२०

७ बाबूराव जोशी - कोल्हापूरचे जे.पी.नाईक - पृ.७८

८ माळी मा.गो. - सातळेकर - एक देवाघरच लेण - पृ.४३

९ कोरगांवकर संस्था - अष्ट वार्षिक अहवाल - पृ.२४

१० गोविंदराव कोरगांवकर धर्मादाय संस्था - संक्षिप्त परिचय -पत्रिका -

११ कोरगांवकर धर्मादाय संस्था - संक्षिप्त अहवाल

१२ गोविंदराव कोरगांवकर धर्मादाय संस्था - कोल्हापूर संस्था -परिचय
पुस्तिका - १९४६

१३ माळी मा.गो.सातळेकर अरविंद - एक देवाघरच लेण - पृ.२६

१४ पाटील क्रांतीकुमार,पाटील जयसिंग,मोहिते बी.पी.-श्री.व्ही.टी.
पाटील गौरव ग्रंथ - हा ग्रंथ चंदनाचा - पृ.२०५
( ताराराणी विद्यापीठ प्रकाशन,१६-४-८६ )

१५ बागल माधवराव - दै.सत्यवादी - १०-७-६६ ( कोल्हापूर )

१६ साधना - शनिवार दि.१२ सप्टेंबर,१९८१ (पुणे )

१७ मौनी विद्यापीठ गारगोटी - संक्षिप्त परिचय - १९५९ - पृ.१

१८ श्रीपाद जोशी - श्री मौनी विद्यापीठ गारगोटी - संक्षिप्त परिचय -
- पुस्तिका - १९५९ - पृ.४

१९ जोशी श्रीपाद - श्री मौनी विद्यापीठ,गारगोटी - संक्षिप्त परिचय
- पुस्तिका - १९५९ - पृ.८

२० जोशी श्रीपाद - -- वरीलप्रमाणे - पृ.१२

२१ जोशी श्रीपाद - -- वरीलप्रमाणे - पृ.

२२ बागल माधवराव - माझा परिवार - पृ.२२

२३